दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ८१ बुधवार दि.०१ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## बारामती दूध संघाकडून लवकरच २ प्रकल्प; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

बारामती: बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ नेहमीच सभासद, शेतकऱ्यांच्या हितासाठी कटीबद्ध आहे. संघाने आर्थिक शिस्त जोपासली आहे. संघ २५ कोटी रुपये खर्च करून नंदन दूध पावडर व पशुखाद्य प्रकल्प उभारणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. संघाची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २८) पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत व संघाचे अध्यक्ष संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी ते बोलत होते. राष्ट्रवादीचे विविध पदाधिकारी, विविध संस्थांवर काम करणारे पदाधिकारी, संचालक आदी या वेळी उपस्थित होते. पवार यांनी तालुक्यात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती दिली. कऱ्हा-निरा जोडप्रकल्प राबवला जाणार असून, त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल, असे ते म्हणाले. संघातर्फे राबविल्या जात असलेल्या पशुवैद्यकीय सेवा, प्रशिक्षण, डेअरी विभागामार्फत दिले जाणारे साहित्य, अनुदानावरील बॅग, मका बियाणे आदींमुळे शेतकऱ्यांना फायदा होत असल्याचे ते म्हणाले. गत वर्षात १५.६७ लाखाचे अनुदान दिल्याचे ते म्हणाले.




संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय वावगे, व्यवस्थापकीय संचालक डॉ. योगेश राणे यांनी स्वागत केले. उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अमोल चव्हाण यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. संघाचे सध्या प्रतिदिन २.७१ लाख लिटर दूध संकलन आहे. २०२४-२५ या वर्षात पुरवठा केलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर ५५ पैसे व प्राथमिक दूध संस्थांना प्रतिलिटर १५ पैसे याप्रमाणे ७० पैसे दूध फरकापोटी ६.९२ कोटींची रक्कम, सभासदांना १३ टक्के प्रमाणे १.११ कोटींचा लाभांश तर संघाच्या कायम कर्मचाऱ्यांना २५ टक्के बोनसपोटी १.६० कोटी रुपये असे ९.६३ कोटी रुपये दीपावलीनिमित्त दिले जाणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष संजय कोकरे यांनी दिली.

## जीवन सुखकर होण्यासाठी मानवी मूल्यांची गरज - प्राचार्य डॉ. अशोक काळम यांचे प्रतिपादन

मुरुड/ महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात दि २९/०९/२०२५ रोजी स्टाफ अकॅडमी आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी मूल्य काळाची गरज या विषयावर प्राचार्य डॉ. अशोक काळम यांचे व्याख्यान संपन्न झाले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक प्रोफेसर डॉ. जी. एल. जाधव, समिती प्रमुख डॉ एस.एन. उबाळे यांची मंचावर उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. काळम म्हणाले की, आपले जीवन अमूल्य आहे आपण त्याची किंमत करणे गरजेचे आहे. मानवी मूल्ये जोपर्यंत प्रत्यक्ष आचरणात आणली जात नाहीत तोपर्यंत त्यांचे महत्त्व समजणार नाही. मानवी जीवन सुखकर आणि आनंददायी होण्यासाठी मूल्यांची नितांत गरज आहे. हे मूल्ये रुजविण्यासाठी अभ्यासक्रमातून ती विद्यार्थ्यांमध्ये रुजणे गरजेचे आहे. तसेच शिक्षण हे उपयोजनात्मक असावे. काम करत असताना ते कोणतेही लहान नाही अथवा मोठे नाही आपण काम कोणत्या हेतूने करतो याला महत्त्व आहे. प्रामाणिकपणे काम केले तर कामाची प्रतिष्ठा वाढते. यावेळी क्रिडा विभाग प्रमुख प्रा. मधुकर क्षीरसागर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समिती प्रमुख प्रा. डॉ. एस.एन. उबाळे यांनी केले सुत्रसंचलन आणि आभार प्रा.एम.बी.गायकवाड यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## रेणापूर येथील आदिशक्ती श्रीरेणुका देवी मंदिरात आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून सपत्नीक महापूजा

लातूर : - असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात असून भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी सकाळी सपत्नीक महापूजा करून भक्तीभावे दर्शन घेतले. नैसर्गिक संकटातून शेतकऱ्यासह सर्वसामान्य जनतेला सावरण्याची शक्ती मिळो, त्यांच्या जीवनात सुख समाधानाचे दिवस येवो अशी प्रार्थना केली.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रेणापूर येथे आदिशक्ती श्री रेणुका देवी नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड यांनी मंगळवारी सकाळी रेणुका मातेची महापूजा व आरती करून मनोभावे दर्शन घेतले. गेल्या काही दिवसापासून पावसामुळे सर्वत्र मोठे संकट निर्माण झाले असून या संकटातून शेतकऱ्यासह सर्वसामान्य नागरिकांना सावरण्याची शक्ती मिळावी, दिलासा मिळावा अशी प्रार्थना आ. कराड यांनी रेणुका मातेच्या चरणी केली. यावेळी मंदिर ट्रस्टच्या वतीने आणि रेणापूर शहर भाजपाच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, दशरथ सरवदे, मंदिर ट्रस्टचे राम पाटील, तुकाराम कोल्हे, रमाकांत वाघमारे, पंडित माने, प्रशांत आकनगिरे, मनोहर व्यवहारे, शहाजी कातळे, दिलीप आकनगिरे, उडगे गुरुजी, रावसाहेब राठोड, राजू पुनपाळे, भाजपाचे चंद्रकांत कातळे, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, अनुसया फड, विद्याताई आकनगिरे, जयश्री कातळे, वसंत करमोडे, लक्ष्मण यादव, शालीक गोडभरले, ओम चव्हाण,



श्रीकृष्ण पवार, राजकुमार मानमोडे, गणेश चव्हाण, संजय वीरुळे, धम्मानंद घोडके, संतोष राठोड, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, अंतराम चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, अंकुश मोटेगावकर, दिलीप चव्हाण, सोपान सातपुते, लक्ष्मण खलंग्रे, हनुमंत भालेराव, अमृतेश्वर स्वामी, नंदकुमार बडे, अंतराम चव्हाण, रफिक शिकलकर, शरद चक्रे, हनुमंत अकनगिरे, मनोज चक्रे, सुभाष राठोड, शेख अजीम, सचिन शिरसकर, टिकू दळवी, शिवा भावे, निवृत्ती येलाले, विकी राजे, आवेश कुरेशी, गणेश भोकरे, रोहित खुमसे, पप्पू कुडके, अजय गाडे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनपा आयुक्तांनी ऐकल्या नागरिकांच्या अडचणी



लातूर /प्रतिनिधी :- मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील विविध ठिकाणी भेटी देऊन नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. या समस्यांची सोडवणूक करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

श्रीमती मानसी यांनी महात्मा गांधी कुष्ठधाम येथे भेट दिली.तेथील कुष्ठरुग्णांसाठी मनपाने घरे बांधून दिलेली आहेत. ही घरे आता मोडकळीस आली असून त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात येत होती. श्रीमती मानसी यांनी तेथे भेट देऊन घरांची पाहणी केली. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. शहरातील मोहन नगर येथे मनपाच्या जागेवर नागरिक अनेक वर्षांपासून राहत आहेत. कॉईल नगर येथेही अशीच परिस्थिती आहे.या नागरिकांना पक्की घरे नाहीत. कबालेही देण्यात आलेले नाहीत. मोहन नगर येथील प्रस्ताव यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेला आहे. तेथील नागरिकांचे म्हणणे ऐकून घेत श्रीमती मानसी यांनी त्यांना पालिकेच्या वतीने केल्या जात असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.शहरात जयनगर येथे सेफ्टी टँकची अस्वच्छता व दुर्गंधी विषयी नागरिकांच्या तक्रारी होत्या.तेथे सेफ्टी टँक बांधून देण्यात आलेला होता. तो मोडकळीस आलेला असून दुरुस्ती करणे आवश्यक होते.त्या परिसराची पाहणी करून आयुक्तांनी तात्काळ संपूर्ण परिसर स्वच्छ करण्याचे आदेश दिले. विजयनगर मध्ये पूर्वी बांधून दिलेली घरे मोडकळी आल्याने त्यांची दुरुस्ती करण्यासंदर्भात नागरिकांची मागणी होती.त्याचीही श्रीमती मानसी यांनी पाहणी केली.



ज्या कारणांसाठी तक्रारी घेऊन नागरिक पालिकेत येत होते अशा ठिकाणांना भेटी देऊन नागरिकांच्या समस्यांची तात्काळ सोडवणूक करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी बांधिल माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची पत्रपरिषदेत माहिती

**जिल्ह्यातील शेतकऱ्यांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनासोबत लोकप्रतिनिधींनी योग्य संवाद साधून याकरिता काय-काय करणे आवश्यक आहे त्या सर्व उपाययोजना कराव्यात असे आवाहन करून माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मदत मिळवून देण्यासाठी आपण कार्यशाळा आयोजित करण्यात असून यामध्ये प्रशासकीय अधिकाजयांसोबत विमा कंपनीच्या अधिकाजयांनाही सहभागी करून घेणार आहोत. या कार्यशाळेत अधिकाधिक मदत कशी मिळेल यासंबंधी चर्चा करून त्या पध्दतीने शासनाकडे अहवाल पाठविणार असल्याची माहिती देवून याच प्रकारे प्रत्येक मतदार संघात लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेवून कार्यशाळेचे आयोजन करावे असे आवाहन केले.**



लातूर/प्रतिनिधी : लातूर जिल्ह्यात यावर्षी विक्रमी अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टीमुळे खरिपाचा हंगाम हातातून गेलेला असून शेतजमिनी खरडून गेलेल्या आहेत. पशुधन दगावल्याच्या घटना घडलेल्या असून जिल्ह्यात घरांचीही पडझड झालेली पाहण्यास मिळत आहे. विशेषत: या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांना सरकारकडून समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी आपण बांधिल असून यासाठी शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा सुरु असल्याची माहिती माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. लातूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आ. संभाजी पाटील निलंगेकर बोलत होते. यावेळी निलंगा विधानसभा प्रभारी दगडू साळुंके, जि. प.चे माजी बांधकाम सभापती संजय दोरवे, बाजार समितीचे सभापती नरसिंग बिराजदार, निलंगा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, मंगेश पाटील, देवणी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरिमे आदींसह पदाधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. लातूरला यापूर्वी रेल्वेने पाणीपुरवठा करण्यात आलेला होता. याची आठवण करून देत आ. निलंगेकर म्हणाले की, दुष्काळ अनुभवलेल्या लातूर जिल्ह्याला आता जलमय परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. यावर्षी लातूर जिल्ह्यात सातत्याने मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून गेल्या दीड महिन्यात अतिवृष्टीला सामोरे जावे लागले आहे. अतिवृष्टीमुळे खरिपाचा हंगाम हातातून गेलेला असून जिल्ह्यात सर्वाधिक पेरा असलेले सोयाबीनचे पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. तसेच खरिपाची इतर पिकेही हाती लागण्याची कोणतीही शक्यता नाही. अतिवृष्टीमुळे जिवीतहानी कमी प्रमाणात झालेली असून पशुधनही दगावले गेले आहेत. पूरपरिस्थिमुळे शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. या सर्व परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी म्हणून आपण पोहोचविला असल्याची माहिती आ. निलंगेकर यांनी यावेळी दिली. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनासह नागरिकांना मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक असणारे पंचनामे १०० टक्के करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिलेले असून पंचनाम्याबाबत कोणाची काही तक्रार असेल तर त्याची दखल घेवून नुकसान झालेल्या प्रत्येकाचे पंचनामे होतीलच अशी ग्वाही आ. निलंगेकर यांनी यावेळी दिली. अतिवृष्टीने सर्वाधिक नुकसान झाले असून शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील मदत मिळालेली असून सप्टेंबरमध्ये झालेल्या नुकसानीची मदत लवकरात लवकर मिळावी यासाठी शासन व प्रशासन यांच्याशी संपर्क साधून आवश्यक तो पाठपुरावा सुरू आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना समाधानकारक म्हणजेच हेक्टरी ५० हजार रुपये मदत कशी मिळेल, यासाठी आवश्यक ती काळजी घेतली जात असून शेतकऱ्यांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी आपण बांधिल असल्याची ग्वाही आ. निलंगेकर यांनी यावेळी दिली. अतिवृष्टीचे नुकसान ही नैसर्गिक आपत्ती असून या आपत्तीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पाठीशी लोकप्रतिनिधी म्हणून सर्व राजकीय मतभेद बाजूला ठेवून प्रत्येकाने खंबीरपणे उभे रहावे, अशी अपेक्षा आ. निलंगेकर यांनी यावेळी व्यक्त केली. त्याचबरोबर शेतकजयांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी सर्वच पक्षातील लोकप्रतिनिधींनी पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर एकत्रित येवून शासनाकडे आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच गरज पडल्यास आंदोलन करण्याची वेळ आली तरी सर्वांनी यामध्ये राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रित यावे, असे आवाहन आ. निलंगेकर यांनी केले.

# संपादकीय

## आभाळ फाटले, ठिगळे लावणार कशी?

महाराष्ट्रासमोर अतिवृष्टीचे संकट उभे राहिले आहे. त्याच्याशी दोन हात करण्यासाठी निधी कसा उभारायचा या विचारात गुंतलेल्या सत्ता पक्षाला केंद्र सरकार थैली मोकळी कशी सोडेल याकडे लक्ष द्यायचे आहे.

मृणालिनी नानिवडेकर अस्मानी आपत्तीने हवालदिल झालेले शेतकरी आपण सुलतानी अनास्थेचे बळी ठरू नयेत या भावनेने पेटलेले आहेत. पावसाची संततधार मराठवाड्याला झोडपतेय. खरोखरच आभाळ फाटले आहे. आधीच भारतातील शेतकरी मान्सूनच्या लहरीपणाचा शिकार! कधी सुका तर कधी ओला दुष्काळ. यावेळी ओल्या दुष्काळाचा फेरा आहे. जनतेला दिलासा द्यायला बांधावर जाण्याचे आदेश खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आणि मंत्री नदीपात्र भासणार्या शेतीपर्यंत जाताहेत. अगतिक शेतकरी असंतोषामुळे या मंत्र्यांना जाब विचारतो आहे. किती मदत देता बोला, असाच रोकडा सवाल आहे. तो बोलून दाखवला जातो आहे. मग अस्मानी संकटाने जेरीला आलेले काही मंत्रीही वैतागताहेत. आम्ही खेळ खेळायला आलोत का, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एके ठिकाणी विचारलेच. सरकारने तरी कुठे कुठे काय काय द्यायचे? बहिणींना लाडके मानलेय, आता शेतकर्यांना चुचकारायची वेळ आली आहे. शेती शाश्वत नसल्याने ती आतबट्ट्याचा व्यवहार झाली होतीच. आता ती आव्हान ठरली आहे. पंजाब राज्याला पावसाने असेच झोडपले. तेथील शेतकरी तर तालेवार.

सिंचन उपलब्ध असलेला. निसर्गाचा एखादा फटकारा सहन करू शकेल असा; पण तोही कोलमडला. त्या राज्याला केंद्राने १६०० कोटींची मदत नुकतीच घोषित केली. आता महाराष्ट्राला किती मदत केली जाणार याकडे शेतकर्यांचे लक्ष लागले आहे आणि विरोधकांचेही. यावर्षी चांगल्या पावसाचा अंदाज होता. सुगी येईल आणि तरारून उभी राहिलेली पिके शेतकरी उचलतील आणि आपल्या मतांची बेगमी होईल, असे सत्ताधार्यांना वाटत होते. प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर पुढच्या निवडणुका सोप्या असतात. चांगला पाऊस चांगले मत परतावे देतो ही यावेळची मन:स्थिती पावसाच्या पाण्यात वाहून गेली आहे. मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीत संकटावर फुंकर घालण्यासाठी काही पॅकेज घोषित होण्याची शक्यता आहे. परिस्थिती अभूतपूर्व आहे.

दुष्काळलेल्या भेगांची छायाचित्रे चिरपरिचित आहेत. किंबहुना ती दरवर्षीची आहेत. या भेगा बुजवायला कितीतरी प्रयत्न आजवर झाले. 'पाणी अडवा – पाणी जिरवा' या घोषणा गेली पन्नास–साठ वर्षे दिल्या – ऐकल्या जातात. पण पाऊस येतो आणि वाहून जातो. तो थबकत नाही, थांबत नाही. या दुखण्याची चिकित्सा खूप झाली. पाण्याला थांबवून थोपवायची, खेळवायची, वापरायची उपाययोजना काही कुणाला राबवता आली नाही. पण चर्चा मात्र खूप झाली. कधी आलाच तर पडून निघून जाणारा पाऊस मातीत शेतीत ठाण मांडून बसला आहे. माती वाहून गेल्याने शेतीपुढे नवे आव्हान उभे झाले आहे. जागतिक तापमानवाढीमुळे असेल किंवा कसे, या कोड्याने शास्त्रज्ञ बुचकळ्यात पडले असताना महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांच्या दुर्दैवाने गावातल्या निवडणुकाही समोर उभ्या आहेत. नैसर्गिक आपत्तीचा असा राजकीय विचार करणे चूक; पण संकट आ वासून उभे ठाकले आहे आणि त्यात केवळ राजकारणच नव्हे तर समाजकारण आणि मुख्यत्वे अर्थकारण गटांगळ्या खात अडकले आहे. ज्या गावांमध्ये वर्षानुवर्षे पाऊस पडतच नाहीत, ती गावे गेले १५ दिवस पावसात उभी राहून गच्च ओली झाली आहेत. सप्टेंबरच्या दुसर्या आठवड्यापासून मराठवाड्याला पावसाने असे झोडपून काढले आहे. १५ दिवसांत सरासरीपेक्षा ६० टक्के जास्त पाऊस झाला आहे. खरिपाचे पीक उभे झाले होते, ते हातून गेले. रब्बीवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहेच. भांडवली खर्च मोठा, गुंतवणूक प्रचंड आणि विक्रीतून मिळणारे मूल्य कमालीचे तुटपुंजे अशा दुष्टचक्रातील शेती आज पार तोट्यात आहे. विरोधकांच्याही आधी सत्ताधारी बांधावर जाऊन पोहोचले हे खरे; पण शेतकर्यांच्या रोषाचा त्यांना सामना करावा लागतो आहे. कर्जमाफीची मागणी जोर धरत आहे. ती मान्य करायची झालीच तर राज्याच्या तिजोरीवर ३० हजार कोटींचा भार पडेल. तो सरकार आज सोसू शकेल का? पायाभूत सुविधात भर घालणारे प्रचंड मोठे प्रकल्प महाराष्ट्रात उभे राहात आहेत. ते प्रामुख्याने नागरी भागात असले तरी नदी जोड प्रकल्पासारखे ग्रामीण भागाचे चित्र बदलणारे प्रकल्पही निर्माणाधीन आहेत.

सरकार त्यावर खर्च करत आहे, कर्ज उभारत आहे. या मोठ्या प्रकल्पांच्या अर्थकारणावर या अतिवृष्टीने पाणी फिरवले आहे. हेक्टरी ५० हजारांच्या मागण्या विरोधक करताहेत. विरोधकांत एकी नाही, जोर नाही. पण शेतकर्यांचे दु:ख मात्र खरे आहे. नदीकाठची शेते तर वाहूनच गेली आहेत. जमीन खरवडली गेली आहे. आर्थिक अडचणीतले सरकार काय करतेय ते पाहायचे.

महाराष्ट्रातला मराठवाडा भाग सतत काही प्रश्न घेऊन पुढे येतो आहे. बरे. हे प्रश्नही कायमच साधेसुधे नसतात तर कमालीचे गंभीर असतात. काही वर्षानुवर्षांच्या सरकारी अनास्थेमुळे निर्माण झालेले असतात. सुलतानी आपत्तीचे असे प्रश्न मराठवाड्याने फार अनुभवले. एक तर निजामाच्या अधिपत्याखालचा प्रदेश, तो महाराष्ट्राच्या मुख्य भूमीशी जोडला गेला तेव्हापासूनच जुलमी राजवटीमुळे निर्माण झालेले भीषण दारिद्र्य, विकासाचा अभाव, उद्योग नाहीत, मागासपणाच्या जखमा स्वातंत्र्योत्तर काळात भरून निघाल्याच नाहीत तर अधिकाधिक गहिर्या होत गेल्या. राज्यकर्ती जमात असूनही मराठा समाज मात्र उपेक्षित राहिला.

औद्यागिकीकरण सुरू झाले आहे. पण सोलापूर, नांदेड, धाराशिव, लातूर, बीड हे सारेच जिल्हे विकासासाठी तहानलेले आहेत. त्यांची तहान भागवणे कोसळलेल्या धारांना शक्य नाही. पाण्यातून मार्ग काढत शेतकर्यांना आधार देणे सरकारसमोरचे आव्हान आहे. कमी वेळात कोसळणार्या पावसात तग धरणारे बियाणे वापरणे, पीकपद्धती बदलणे अशी आव्हाने मोठी आहेत. पण ती दीर्घकालीन. कोसळत असलेल्या पावसाने उद्ध्वस्त झालेल्यांना ताबडतोब दिलासा हवा आहे.

# धम्मचक्र प्रर्वतन दीन ,समतेचा नवा उषःकाल

बौध्द परंपरेत विजयादशमीला धम्मचक्र प्रर्वतन दिन म्हणून विशेष महत्त्व दिले आहे. आणि हा दिवस भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. १४ ऑक्टोबर १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथील दिक्षाभुमीवर लाखो अनुयायांसोबत बौध्द धर्माची दिक्षा घेतली होती. तेव्हापासून भारतीय समाजजीवनात नवा अध्याय सुरू झाला. हा दिवस सामाजिक समतेचा, बंधूभावाचा व मानवतेच्या मुल्यांचा दीपस्तंभ ठरला. आणि तोच दिवस म्हणजे विजयादशमीचा दिवस होता. बाबासाहेबांनी आयुष्यभर अस्पृश्यता, विषमता आणि अन्याय विरूद्ध लढा दिला. हिंदु धर्मातील जातीव्यवस्था आणि असमानतेतून मुक्ती मिळवण्यासाठी त्यांनी शेवटी बौध्द धर्म स्वीकारला. बौध्द धर्मात समता, करूणा, मैत्री आणि प्रज्ञेचा सुंदर संदेश आहे. मानवाने मानवाशी समता राखली पाहिजे ही बाबासाहेबांची ठाम धारणा होती. त्यांच्या दृष्टीने बौद्ध धर्म हा केवळ धार्मिक स्वीकार नव्हता, तर तो सामाजिक न्यायाचा आणि विचारस्वातंत्र्याचा मार्ग होता. धम्मचक्र प्रर्वतन दिनाच्या दिवशी दरवर्षी लाखो अनुयायी दिक्षाभुमीवर एकत्र येतात. त्या दिवशी केवळ बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव होत नाही, तर बौध्द धर्माच्या मुल्यांची आठवण करून देत नवी प्रेरणा मिळते. समाजात बंधूभाव, प्रामाणिकपणा, कष्टाची गोडी आणि एकतेची भावना जागवण्याचे काम हा दिवस करतो. दिक्षाभुमीवर उभे राहून लाखो लोक बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करतात आणि आपल्या कृतींनी त्या विचारांना जिवंत ठेवण्याचा संकल्प करतात. आजच्या काळातही विषमता, अन्याय, भेदभाव यांचे आव्हान समाजासमोर उभे आहे. विज्ञान, पैसा, तंत्रज्ञान यांची झपाट्याने वाढ झाली आहे; पण माणसामाणसातील दरी अजूनही संपलेली नाही. अशा परिस्थितीत धम्मचक्र प्रर्वतन दिन आपल्या स्मरण करून देतो की खरी प्रगती फक्त साधनसंपत्ती आणि यंत्रांच्या वेगाने होत नाही, तर ती समता, बंधुता आणि न्याय यांच्या आधारावर घडते. जर बाबासाहेब आजच्या घडीला आपल्यासमोर असते, तर त्यांनी नक्कीच धम्मकृतीची नवी दिशा दाखवली असती. ते सांगितले असते की बुद्धाचे धम्म केवळ ग्रंथात किंवा यत्रांमध्ये शोधायचा नाही, तर तो आपल्या कृतींमध्ये उतरवायचा आहे. पर्यावरण रक्षण, स्त्री–पुरुष समता, आर्थिक असमानतेविरुद्ध लढा, शिक्षणातील समान संधी, तंत्रज्ञानाच्या योग्य वापरातून मानवी विकास–या सर्वच क्षेत्रात धम्मकृती घडवणे आजची खरी गरज आहे. समानतेवर आधारलेला समाज उभारल्याशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण राहते हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रखर आहे. धम्मकृती म्हणजे केवळ उपदेश नव्हे; ती म्हणजे दररोजच्या आचारात, नात्यांमध्ये, कामधंद्यात समतेचा आणि करुणेचा प्रकाश पेरणे होय. बाबासाहेबांचा संदेश आपल्याला आवाहन करतो की जातीभेद, धर्मांधता आणि अन्यायाविरुद्ध लढा देताना आपण रागाने नव्हे तर प्रज्ञा, मैत्री आणि करुणेच्या भावनेने उभे राहावे. डिजिटल युगातील विषमता–शिक्षण, रोजगार, माहिती यामधील दरी–ही सुद्धा त्यांच्यासाठी लढ्याची नवीन भूमी असती.धम्मचक्र प्रर्वतन दिन हा केवळ एका धर्माचा दिवस नसून तो सामाजिक क्रांतीचा प्रारंभबिंदू आहे. सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा ऐतिहासिक दिवस आहे. बाबासाहेबांचे विचार आठवून आपण प्रत्येकाने मानवतेच्या मुल्यांवर चालत राहावे, हीच त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी आणि त्यांच्या कार्याला पुढे नेणारी खरी कृती ठरेल. धम्मकृतीच्या या प्रवासात प्रत्येकाची जबाबदारी आहे–आपण कुठल्याही पदावर, कुठल्याही स्तरावर असलो तरी समतेच्या बिजांची पेरणी करणे हेच खरे धम्मकार्य ठरेल.

**********

संगीता बोरकरबांबोळे, गोंडपिपरी,चंद्रपूर
९४०५७१८४६३

# बाबासाहेबांनी दिक्षा दिली, आपण बौद्ध कधी होणार?

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्म देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या जिवनात काही फरक पडला का? काही परिवर्तन झाले का? याचे उत्तर द्यायचे तर हो.. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध दिला आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या जिवनामध्ये अमुलाग्र बदल झाला. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व वैचारिक प्रगती होऊन विज्ञानवाद रुजायला सुरुवात झाली. मान, सन्मान व स्वाभिमान मिळाला. तथागत बुद्धांच्या धम्माचे आचरण करणारा प्रत्येक व्यक्ती हा जिवनात यशस्वी होऊन आनंदी व आदर्श जिवन जगतो यात कोणतीही शंका नाही. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या एका धाडशी निर्णयामुळे येथील मानसाला सोन्याचे दिवस आले. एवढी ताकद तथागत बुद्धांच्या धम्मात आहे. मानवाच्या कल्याणासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वोतोपरी सर्व काम करून ठेवले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कोणतेही विचार व कार्य घेतले तर ते मानवाचे व देशाचे कल्याण करणारेच आहे. फक्त मानवतेचा चष्मा डोळ्याला हवा मेंदू मध्ये विषमतेची घाण नसावी. बाबासाहेब यांनी धम्माची दिक्षा देऊन आम्हाला नवीन संस्कृती, नवीन संस्कार तर दिलेच पण नवीन जिवन पद्धती देऊन आमची आदर्श ओळख निर्माण करून दिली. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धांचा धम्म अनुसरून जनतेचा उद्धार केलाच. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांची जबाबदारी पार पाडून अत्यंत बिकट परिस्थिती मध्ये जेथे विषमता नसानसात भिनलेली होती, मान सन्मान हा तर अस्पृश्यांना माहितच नव्हता अशा वेळी ओळख निर्माण करून देणे म्हणजे क्रांतीच होय. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षा दिली, आमची प्रगती झाली हे खर असतांना मुख्य प्रश्न आहे की आम्ही बौद्ध कधी होणार? बरेच लोक म्हणतात आम्ही १४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध झालो. पण वास्तविक पणे पाहिले तर २०२५ मध्येही आम्ही बौद्ध आहोत का? याची मिमांसा होणे गरजेचे आहे. स्वतःला बौद्ध म्हणून घेण्यासाठी प्रत्येकाने वेगवेगळे निषक लावले आहेत. फक्त घरात बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो मुर्ती लावणारे ही म्हणतात आम्ही बौद्ध आहोत. काही लोक आम्ही विहारात जातो म्हणून स्वतःला बौद्ध समजतात. काही लोक आम्ही अंधविश्वास व थोतांड मानत नाही म्हणून स्वतःला बौद्ध समजतात, काही लोक दारू पित नाहीत म्हणून स्वतःला बौद्ध समजतात, काही लोक पुर्वी महार होतो पण आज स्वतःला बौद्ध समजतात. खरं पाहिले तर हा निकष बौद्ध असल्याचे किंवा तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी असल्याचे सिद्ध करते का? तर मुळीच नाही. बौद्ध होण्यासाठी माणसाला जागृत असुन तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर चालावे लागते. फक्त बोलुन बौद्ध होता येत. बोलण्यात एक व वागण्यात एक असेल तर तो धम्म विरोधी आहे हेच सिद्ध होते. मग बौद्ध कोणाला म्हणायचे? जो पंचशिलेचे पालन करतो तो बौद्ध. जो धम्मानुसार चालतो तो बौद्ध. जो डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आदर्श मानुन त्यावर मार्गक्रमण करतो तो खरा बौद्ध. तथागत बुद्ध, कोणत्याही प्रकारचा भेद, द्वेष मान्यच करत नाहीत. तथागत बुद्ध परिवर्तनासाठी संघ अर्थात संघटना अर्थात एकी यावरच विश्वास ठेवतात. मग आज आपण पंचशीलेचे पालन करतो का? आदर्श जिवनाचा व प्रगतीचा मार्ग म्हणजे पंचशील आहे. घरात बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लाऊन, गाडी मध्ये फोटो लाऊन तिच गाडी बार च्या समोर उभी करून मद्य प्राशन करणारा आणि स्टेज वर भाषण देणारा कधीच बौद्ध असु शकत नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांना लुटणारा आणि स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहणारा कधीच बौद्ध असु शकत नाही. तोंडात मावा, तंबाखू, गुटखा टाकून विहारात जाणारा बौद्ध असुन शकत नाही. बर बरेच लोक काही प्रमाणात पंचशीलेचे काटेकोर पण पालन करण्याचा धम्माच्या शिकवणुकी प्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतात त्यांचे खरोखर मनापासून अभिनंदन करावे वाटते. पण समाजात वावरतांना मुला मुलीचे लग्न करतांना मुला मुलींचे गुण न बघता पैसा आणि पोटजात बघुन लग्न करणारे लोक नेमकी कोणती समता मानत असतील हा गहन प्रश्न आहे. स्वतःला सुशिक्षित समजून हाय क्लास, मिडल क्लास, लो क्लास समजणाऱ्या लोकांना बुद्धांची समता फक्त बोलण्यातच पाहिजे का? हा बावना तो शहाना काय प्रकार आहे हा? पोटजाती बघून श्रेष्ठत्व किंवा पोटजाती बघून प्राधान्य देणारा व्यक्ती बौद्ध असुच शकत नाही. मग घरात घरावर, गाडी मध्ये किती मोठा फोटो, मुर्ती लावू दे तो बौद्ध होऊच शकत नाही. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी समाजाचे एकसंघ असायला पाहिजे. एकजूट व एकी असायला पाहिजे. समाज परिवर्तन करण्यासाठी तथागत बुद्धाला संघाची गरज होती. आणि आज स्वतःला बौद्ध समजणारे वेगवेगळ्या संघटना सुरू करून विखुरले गेले. स्वतः ची झोळी भरण्यासाठी बुद्ध, बाबासाहेब व चळवळीचे नाव घेऊन जगण्याची वेळ आली. स्वतः च्या संघटना सुरू करून विखुरलेला समाज काहीच करू शकत स्वत:चा मान सन्मान व स्वाभिमान ही टिकवू शकत नाही. परंतु समाजाची एकसंघ एकजूट असेल तर समाजाची सर्वांगीण प्रगती करून प्रत्येक मानसाला सारख्या प्रमाणात लाभ मिळू शकतो हा बुद्धांचा इतिहास विसरणारे लोक बौद्ध कसे असु शकतात का? दरवर्षी विजयादशमी साजरी करण्यासाठी दिक्षाभुमीला वेगळे स्टेज, वेगवेगळे बॅनर लागतात. वेगवेगळे स्टेज आणि बॅनर लावून स्वतः स्टेजवर जाऊन संघं सरणं गच्छामी म्हणतात जिभ अडखळत का नाही. बेकी करून संघाला अर्थात बुद्धांच्या एकीला मी शरण जातो असे म्हणणे म्हणजे धम्मा सोबत केलेली गद्दारी नाही का? बौद्ध समजून पक्ष, संघटना, झेंडे व नेते वेगवेगळे करून मनुस्मृती चे पालन करणारे आणि विचार व आचणाने गुलाम असणारे लोक बौद्ध असु शकत नाहीत. कित्येक शिकलेले लोक आजही अंधविश्वास, पाखंड व भोंदूगिरी वर विश्वास ठेवून वेगवेगळे कर्मकांड करतात, अज्ञानावर आधारित उपक्रम साजरे करतात, लग्नामध्ये हळदी पासून ते दारक दारिका असलेल्या मुलाला व मुलीला एवढे सजवतात, त्यातही अनेक प्रथा, कर्मकांड असतात की समोरचा बुद्धाचा अनुयायी आहे हे समजणेच मुर्खपणाचे ठरते. दरवर्षी विजया दशमी एका ठिकाणी येऊन वेगवेगळ्या स्टेजवर साजरी होत असेल तर आम्ही विजय नेमका कशाचा साजरा करतोय? धम्म स्विकारण्याचा उद्देश साध्य झाला का? अपवादात्मक उदाहरणे देऊन फक्त नियम सिद्ध करता येत असतो. अपवाद म्हणजे नियम नसतो. हे ज्याला समजले तो नक्कीच विचार करेल आपण अजूनही बौद्ध झालो नाही. आपण स्वतःला बौद्ध समजत असु, आपण बुद्ध बाबासाहेब यांचे नाव घेत असु पण आजही वैचारिक व वर्तनाच्या पातळीवर बौद्ध होणे बाकीच आहे. जर आम्ही बौद्धच झालो नाही तर दरवर्षी विजया दशमी आम्हाला साजरा करण्याचा नैतिक अधिकार आहे का? कारण विजया दशमी अर्थात धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा बौद्ध झालेल्या लोकांसाठी विचाराचा व आचरणाचा प्रचार प्रसारासोबतच समिक्षा करण्याचा दिवस आहे. जे धम्माला मलिन करू पाहत आहेत त्यांनी विजया दशमी साजरा करू नये. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दूरदृष्टी ठेवून धम्माची वाट आम्हाला दिली. आम्ही धम्माच्या वाटेने न जाता भलत्याच वाटेने जाऊन धम्मा मध्ये भेसळ करण्याचा प्रयत्न करत आहोत. कोणताही दिवस साजरा करताना त्या दिवसाचे महत्त्व समजून घेऊन त्यावर चिंतन मनन करून भविष्यात अजून काय नियोजन व परिवर्तन आवश्यक आहे यावर चर्चा व्हायला पाहिजे. पण सध्या जो तो येउन भाषण देऊन निघून जातो यामुळे ना चळवळ वाढत ना परिवर्तन होत. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिक्षा जरी दिली असली तरीही अजून आपण बौद्ध झालो नाही. बौद्ध होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करूया. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या धम्माचे महत्त्व समजून घेऊन धम्मानुसार वागण्याचा प्रयत्न करणाऱ्या, समाज संघटीत राहून स्वतः ची नाही तर समाजाची सामुहिक प्रगती व्हावी म्हणून फुल ना फुलाची पाकळी योगदान देणाऱ्या सर्वांना विजयादशमी च्या मंगलमय कामना..

*******

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट कोणते ?.

आजच्या तरुणांना रिपब्लिकन पक्ष कोणाचा आहे असे विचारले तर काय उत्तर मिळेल?.ते ऐकण्याची तयारी कोणाचीच नसणार,कारण त्यांच्या आजू बाजूच्या नगरातील विभागातील कार्यकर्ते नेते दररोज सकाळी कुठे भेटतात आणि संध्याकाळी काय करतात.त्यांचे उधोगधंदे व उत्पन्नाची साधन व मार्ग कोणते यांची पूर्ण कल्पना विभागातील समाजाच्या लोकांना असते.त्यांनी जर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतिकारी तत्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला तर लोक त्यांच्याकडे तिरक्या नजरेने पाहतात.कारण क्रांतिकारी विचाराचे आचारण कुठेच दिसत नाही.दलाली,गुलामगिरी आणि लाचारी नसानसात भरलेली माणस जेव्हा स्वाभिमानाची गोष्ट करतात,तेव्हा जवळची लोकच त्यांच्याकडे संशयाने पाहतात.ते तसे जगण्यासाठीच एकाच नगरात एकाच गटाशी प्रामाणिक राहत नाही,तथागत बुद्ध वाचनालय काढतील पण त्यावर बुद्ध आंबेडकर यांच्या फोटो पेक्षा राष्ट्रवादी नेत्याच्या भाऊ,वहिनी,आईचा फोटो किती महत्त्वाचा आहे हे नगरातील विभागातील लोकांना दाखवुन देतील.त्याला स्वाभिमानी, आंबेडकरी विचारांचे माणस विरोध करण्याचे धाडस कधीच करत नाहीत.मागे जरूर बोलतील पण समोर नाही.मूर्ख आहे तो! त्यांच्या कशाला नादी लागावे असे म्हणूनच त्याला सोडून देतील.पुढे जयंतीला,वर्षावास समारोप,महापरिनिर्वाण दिनाला भोजन दान व बॅनर त्यांच्या कडुनचं आर्थिक मदत मात्र न चुकता घेतील.त्यामुळे नगरात विभागात रिपब्लिकन कार्यकर्ता नेता जातीने व कार्याने ओळखला जातो. आज माझी मुले विचारतात रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट काय होते?. ते कुठे दिसते काय ? प्रत्येक नेत्याचे समाजा बाबत काय मत आहे हे जर ऐकले तर लढावे की रडावे हाच प्रश्न पडतो.

क्रांतिकारी विचाराचा शब्द रिपब्लिकन आणि बहुसंख्येने असलेला समाज म्हणजे हत्ती सारखी शक्ती तीच आपली निशाणी.कुठे आहे?. अडूसट (६८) वर्षात आम्ही हा इतिहास किती वाचला,समजला आणि आचरणात आणला?.भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अधिकृत नाव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे आहे.भारतीय रिपब्लिकन पक्ष हा भारतातील शोषित पिडीत आदिवाशी मागासवर्गीय समाजाचा म्हणजे बहुजन समाजाचा रिपाई म्हणूनच ओळखला जातो.तसा भारतातील सर्वात मोठी संख्या असणाऱ्या समाजाचा हा राजकीय पक्ष आहे. डॉ.भिमराव आंबेडकरांनी सुरू केलेल्या शेडूयूल्ड कास्टस फेडरेशन या सामाजिक संघटनेतून हा पक्ष उदयास आला.या पक्षाचे मुख्य बलस्थान महाराष्ट्र होते.शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन या सामाजिक संघटनेने राजकारणात उतरून निवडणुकीत भाग घेतल्यामुळे अनेक समाजाचे समीकरण बदललेले होते. त्याचमुळे त्याची राजकीय पक्षात गणती होत होती.आज तो सत्ता मिळवुन देणारा समाज म्हणूनच ओळखला जातो.

शेडूयूल्ड कास्टस फेडरेशन या सामाजिक संघटनेतून राजकीय पक्ष.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ही संकल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची होती.त्याच्या महापरी निर्वाणा नंतर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी त्यांच्या निष्टावंत अनुयायांनी रिपाईची स्थापन केली. पण सुरवात पासूनच या पक्षाचा संपूर्ण इतिहासच अहंकाराचा आणि फाटाफुटींनी भरलेला आहे. तेव्हा पासून आज पर्यंत दररोज रिपब्लिकन हा शब्द असलेला एक राजकीय पक्ष (गट) स्थापन होतो आणि पुढे तो फुटतो,असे या ऐतिहासिक रिपाई प्रक्रियेचे एकूणच वर्णन करता येईल.त्यामुळेच रिपब्लिकन पक्ष त्यांच्या अंतिम उद्धिष्ठा पर्यंत पोचला नाही.भारताला आणि भारतीयांना कठीनातील कठीण प्रश्न,समस्या सोडविण्यासाठी बाबासाहेबांनी लोकशाही दिली.संविधानाची योग्य अमंलबजावणी केली तर कोणत्याही समस्या सुटू शकते.हे त्यांनीच आत्मविश्वासाने सांगितले होते.पण रिपाई ने त्याला महत्व न देता स्वार्थ व अहंकार या शब्दाला यांनी खूप महत्व दिले आहे.म्हणून आज ही यांची संपूर्ण इमारत त्यावरच उभी आहे.बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ बौद्ध धम्माची दिक्षा देताना त्यात त्यांनी त्रिसरण,पंचशील,आणि बावीस प्रतिज्ञा दिल्या होत्या हे सर्वच कार्यकर्ते नेते विसरले आहेत.म्हणून रिपाई किंवा इतर समाजिक,धार्मिक संघटना नेहमी अहंकारा पायी फुटतात असे म्हटले तर चूक ठरणार नाही. त्यांनी संविधान मान्य केले असते तर आज रिपब्लिकन समाज रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ठ गाठण्याच्या स्पर्धेत असता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष म्हणून ओळखणारा रिपाई पहिल्यांदा फुटला तो १९५८ साली.म्हणजे पक्ष स्थापने नंतर एक वर्षांच्या आतच.तेव्हा ही नेतृत्व कुणी करायचे,यावरूनच पक्ष फुटला होता.त्यातून खोब्रागडे –गायकवाड आणि कांबळे–रूपवते असे दोन गट निर्माण झाले.१९६४ मध्ये गायकवाड गटातून आर. डी.भंडारे बाहेर पडले तर १९६५ मध्ये कांबळे गटात फूट पडून रूपवते बाहेर पडले आणि गायकवाड गटाशी त्यांचे ऐक्य झाले. म्हणजे ज्यांना विरोध केला त्यांच्या कडेच गेले.पुढे आर.डी.भंडारे आणि रुपवते काँग्रेसवासी झाले.त्यानंतर आजपर्यंतचा या पक्षाचा संपूर्ण प्रवास फाटाफूट आणि ऐक्य यांनी रंगलेला आहे.वारंवार झालेल्या या फाटाफुटी व ऐक्यामुळे 'फूट' आणि 'ऐक्य' या दोन्ही शब्दांचे रिपब्लिकन चळवळीच्या संदर्भातले गांभीर्यच नष्ट झाले आहे.आता पर्यंत या पक्षाची ५० हून अधिक छकले झाली आहेत, आणि अशा प्रत्येक छकलाचा एक स्वतंत्र राजकीय पक्ष झाला. रिपाई नांवा शिवाय हे स्वताचे अस्तित्व दाखऊ शकत नाही.

क्रांतिकारी विचारांच्या आंबेडकर अनुयायाची आत्मपरीक्षण करण्याची तयारी नसल्यामुळे मी बरोबर बाकी सर्व चूक हे सिद्ध करण्यात या नेत्यांनी आपली व्यापक रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात येऊच शकत नाही ?. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या आंबेडकरी चळवळ संपली आहे पुस्तकरुपी निष्कर्षा नंतर त्यांनी आंबेडकरी विचारांचे चळवळीचे काम करणे सोडून दिले आणि डाव्या विचाराच्या विविध गटांना जवळ करून नक्षलवादी विचाराच्या तरुणाना जाहीर पाठिंबा दिला त्यातूनच महाराष्ट्र लोकशाही आघाडी निर्माण झाली होती.आता तर सर्व समाज आणि कार्यकर्ते नेते विचारापासून वंचित झाले आहेत.आणि त्यांची वंचित घटकांची वंचित बहुजन आघाडी राज्यात एक वेगळे राजकीय पटावर स्थान निर्माण करीत आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडें सारखा प्रामाणिक नेता खासदाराचे मागच्या दराने आमदार झाले. आणि रिपाई मधील उरला सुरला प्रामाणिकपणा संपवला.रिपब्लिकन चळवळ नावापुरती शिल्लक राहली असा धोक्याचा गंभीर इशारा देणाऱ्या बाळासाहेबांनी आंबेडकरी चळवळीच्या वाताहताची शोधून काढलेली कारणे आणि मांडलेले निष्कर्ष पाहता त्यावर सविस्तर चर्चा खूप झाली.पण ते केवळ कार्यकर्त्याच्या लेवलवर,ती बुद्धीजीवी वर्गाच्या पातळीवर झाली असती तर समाजाला नेमकी दिशा देता आली असती. परंतु बहुसंख्य बुद्धीजीवी भिती पोटी सत्य मांडण्याचे धाडस करीत नाही. अनेकांनी आंबेडकरी चळवळ संपली नसल्याचे दावे केले,पण तिच्या जीवंतपणाची लक्षणे कोणती ह्याबाबत ठामपणे स्पष्टीकरण दिले नाही.आज आंबेडकरी चळवळीचे बालेकिल्ले संपूर्णपणे उध्वस्थ झालेले (वैचरिक पातळीवर) स्पष्ट दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल एक पत्र १ ऑक्टोबर १९५७ रोजी 'प्रबुध्द भारत' मध्ये भारतीय जनतेला उद्देशून प्रसिद्ध झाले होते. हे पत्रच रिपब्लिकन पक्षाची घटना मानली जावी असा सर्व नेत्याचा आग्रह होता.त्यात न्याय,समता,स्वातंत्र्य आणि बंधुता हि पक्षाची ध्येय असतील,पक्षाच स्वरुप प्रादेशिक न राहता ते देशव्यापी असेल असे स्पष्ट करुन,आपल्या अनुयायांना बाबासाहेब सांगतात, 'हा पक्ष देशातील सर्व कष्टकरी मागासवर्गीय समाजातील शोषित,वंचित,पिडीत जनतेच्या हिताचा रक्षणकर्ता असेल.अनुसूचित जाती–जमाती,बौद्ध आणि मागासवर्गीय लोकांच्या हितासाठी प्रयत्न करण्याची बांधिलकी स्विकारलेला असेल.शासनकर्ती जमात बनतांना जो पक्ष आपल कल्याण करील,त्यांच्याशी हातमिळवणी करावी. दुस–या पक्षाशी सहकार्य करतांना आपला पक्षाच्या तत्वज्ञान,ध्येय आणि उदिष्ट यांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी.नेता एकच असावा आणि पक्षही एकच असावा.पक्षाच चिन्ह हत्ती हे बुद्ध संस्कृती मधिल प्रतिक तर,अशोक चक्रांकित निळा झेंडा हे निशाण असे बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या पक्षाबद्दलचे मत स्पष्टपणे मांडलेले होते.हा इतिहास आजचा तरुण वाचायला तयार नाही.म्हणून तो इतिहास वाचून इतिहास घडविण्यास तयार नाही.तो दिशाहीन झाला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर ३ ऑक्टोबर १९५७ साली बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची नागपूर दिक्षा भूमीवर स्थापना झाली होती. त्यानंतरच्या सार्वत्रिक निवडणूकात पक्षाने दैदिप्यमान, नेत्रदिपक यश संपादन केले होते.त्यावेळी त्याची राजकीय शक्ती प्रभावशाली आणि सर्व समाजाचे लक्षवेधनारी होती,त्यात सतर टक्के असंघटीत कष्टकरी मजूर,शेतमजूर, कामगार होता. त्यांचा नेत्यावर विश्वास होता.

# केज येथे घरात वेश्या व्यावसाय; डमी ग्राहकास घरात नेतानाच पोलिसांनी मारला छापा.

केज/प्रतिनिधी केज येथील एका घरात वेश्या व्यावसाय असल्याची एका गुप्त खबऱ्या मार्फत माहिती मिळाली, सदर मिळालेल्या माहितीनुसार पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेच्या महिला पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, महिला पोलीस राधा चव्हाण, सुलोचना वाळके यांच्यासह पथकातील कर्मचारी व केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्यासह केज पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी सदरची कारवाई केली, यामध्ये पिडीतेची सुटका करण्यात आली आणि व्यावसाय चालवणाऱ्या महिलेला अटक करून ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार दिनांक २९ सप्टेंबर२०२५ रोजी केज शहरातील उमरी रोडजवळील गणेश नगर भागात एक महिला ही आपल्या घरात वेश्या व्यावसाय चालवत असल्याची गुप्त खबऱ्याकडुन माहिती पोलिसांना मिळाली जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सायंकाळी ५-०० वाजता च्या




सुमारास गुप्त खबऱ्या मार्फत मिळालेल्या बातमीची शहानिशा करून एक डमी ग्राहक पाठवून तपासाची चक्रे वेगाने सुरु केली ग्राहक पिडीत महिलेला रुममध्ये घेवून जाताच पोलिसांनी धाड टाकून ५२,वर्षीय वेश्या व्यावसायीक महिलेला ताब्यात घेऊन अटक केली.यातील आरोपी हिने पिडीत महिलेला स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी बोलावून स्वतःचे ताब्यातील जागेचा वापर करून त्याच कमाईवर उदर निर्वाह करून वेश्या व्यावसाय करण्यास लावले व सदर महिलेचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून या प्रकरणी पल्लवी भाऊसाहेब जाधव यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गु.र.नं.५३१/२०२५ कलम ३,४,५,६ अन्वये अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा(पिटा)१९५६ प्रमाणे दाखल अंमलदार मपोह/१२९४ दगडखैर यांच्या कडे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर घटनेचा पुढील तपास हा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे हे करत आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी वाहतूक शाखेच्या महिला पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव व पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे, पोलीस हवालदार बाळासाहेब अहंकारे, प्रकाश मुंडे, महिला पोलीस सुलोचना वाळके, राधा चव्हाण यांच्यासह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने केली आहे. सदरच्या कारवाईमुळे छुपा वेश्या व्यवसाय व अवैध्य धंदे चालविणाऱ्यांना धडकी भरली असून सदरच्या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## अपहरण, जबरी चोरी करुन खुन करणाऱ्या आरोपीस अटक.

लातूर :- अपहरण, जबरी चोरी करुन खुन करणाऱ्या आरोपीस अटक. २९/०९/२०२५ रोजी मयत अमिरअली सय्यद व उत्तरप्रदेशातील कामगार लोकेशकुमार, सचिनकुमार, इशेंद्रकुमार असे सोलापुर येथुन मयताचे गावी सायगाव ता. अंबाजोगाई जि.बिड कडे जाणेसाठी लातुर येथे आले असता रेणापुर नाका लातुर येथे रात्री १.३० वाजणेच्या सुमारास ऑटोचा धक्का लागल्यानंतर झालेल्या वादाचे कारणावरुन ऑटो मध्ये आलेल्या समिर नावाचे इसमाने व त्याचे सोबतच्या अनोळखी ऑटो चालक इसमाने अमिरअली सय्यद यास हाताने व चाकुने मारहाण करुन चाकुचा धाक दाखवुन अमिर जवळील मोबाईल हिसकावुन घेवुन त्यास त्यांचेजवळील ऑटो मध्ये जबरदस्तीने बसवुन घेवुन जावुन चाकुने मारहाण करुन अमिरअली सय्यद यास जिवे ठार मारुन हॉटेल आण्णा व्हेज नॉनव्हेज चे गेट समोरील रिंग रोडचे कडेला टाकुन निघुन गेले. वगैरे तक्रार मयतासोबत असलेला कामगाराचे फिर्यादवरुन पो. स्टे. विवेकानंद चौक लातुर येथे गुरन ६४७/२०२५ कलम १०३(१),१४०(४), ३११,३(५) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास सपोनि खोडेवाड हे करित आहेत.




माहीती मिळताच घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच उपविभागीय पोलीस अधीकारी लातूर शहर श्री समीरसिंह साळवे, पो.नि. बावकर स्था.गु.शा. लातुर यांनी तात्काळ भेट देवुन यातील आरोपीतांचा शोध घेणे बाबत व तपासाबाबत सुचना दिल्या. दिलेल्या सुचनेप्रमाणे पो.स्टे. विवेकानंद चौक येथील पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी त्यांचे स्टापसह तपास करुन गुन्ह्यातील आरोपी शेख समीर दिलावर,वय २६ वर्षे रा. साई रोड आर्वी लातुर यास अटक करुन त्याचेकडुन गुन्ह्यातील हत्यार तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेला ऑटो जप्त करण्यात आला आहे.

तसेच एक विधीसंघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेण्यात आले असुन गुन्ह्याचा पुढील तपास चालु आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री.मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधीकारी लातूर शहर श्री. समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथील सपोनि अन्नाराव खोडेवाड, वसंत मुळे, पोउपनि रेडेकर, पोलीस अमंलदार खुर्रम काझी, सुनिल हराळे, रविंद्र गोंदकर, यशपाल कांबळे, रणविर देशमुख, धैर्यशिल मुळे, सचिन राठोड, गणेश यादव,आनंद हल्लाळे, दयानंद उपासे, महेबुब शेख, चालक दिपक कांबळे यांनी केली आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य खंडाचे फकिरा ब्रिगेडच्या वतीने मोफत वाटप

लातूर / प्रतिनिधी :- साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे अकरा खंड महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीने प्रकाशित केले आहेत या खंडाचे मोफत वाटप महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री मा.ना.संजय शिरसाठ, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री,मा.ना.अतुल सावे, माजी केंद्रीय अर्थराज्य मंत्री खा.डॉ.भागवत कराड,मा. आ.सतीश चव्हाण,मा. आ.विक्रम काळे,मा. आ.रमेश कराड, भाजपाचे



शहर जिल्हाध्यक्ष मा.श्री.किशोर शितोळे यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत दिनांक ५ ऑक्टोबर२०२५ रोजी शिव छत्रपती महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे होणार आहे.याच कार्यक्रमात मातंग व तत्सम जातीतील एमपीएससी, यूपीएससी,नेट/सेट स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण , पीएचडी प्राप्त, विद्यार्थ्यांचे तसेच ज्यांना शासनाचा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाला आहे तसेच सामाजिक बांधिलकी माणून सामाजिक कार्यकरणा-या कार्यकर्त्यांचा, कर्मचारी /अधिकारी यांचाही सत्कार करण्यात येणार आहे. ज्या वाचक अभ्यासकांना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे खंड लागणार आहेत अशा वाचक, अभ्यास, समीक्षक यांनी खालील कार्यकर्त्याना मोबाईल करावा प्रा.राजेंद्र लोदगेकर -७९७२६८१५१९, संजय विरूळे -८०८०१३२३१५,बाबासाहेबजोगदंड-९९२१४५१२८९,किशोर कसबे -९९२१३१४७१८, पांडुरंग मस्के -९०९६६९५२६२,

या कार्यकर्त्याशी संपर्क साधावा असे आवाहन अविनाश साठे, संतोष पटनुरे, विकास लोंढे,शरद धबडगे, गोविंद धबडगे, एकनाथ मस्के, विपुल तपघाले, ऋषी भडांगे, तुकाराम मस्के, सतीश मस्के, विकास राऊत अंकुश कांबळे, अनंत दोरवे, सुदर्शन शिंदे, नारायण कांबळे यांनी केले आहे.

## शिवमल्हार प्रतिष्ठान आयोजित शारदीय नवरात्र महोत्सवा निमित्त गरबा स्पर्धा संपन्न शिवमल्हार प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

केज/प्रतिनिधी केज शहरातील उमरी रोड येथील शिवमल्हार प्रतिष्ठान आयोजित शारदीय नवरात्र महोत्सवा निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आठव्या माळे निमित्त केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गरबा स्पर्धा संपन्न झाल्या आहेत. शिव मल्हार प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने याही वर्षी शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक उपक्रम गेल्या आठ दिवसापासून घेण्यात आलेले आहेत. आठव्या माळीच्या दिवशी केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गरबा महोत्सव मोठ्या



उत्साहात संपन्न झाला या महोत्सवामध्ये या भागातील महिला व मुलींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला होता. यावेळी युवा उद्योजक अमोल भैरे, सामाजिक कार्यकर्ते तथा युवा उद्योजक ओम चादर, ज्ञानेश्वर कलढोणे, भागवत काळे, ईश्वर गायके, सचिन सौदागर यांच्यासह शिव मल्हार प्रतिष्ठानचे पदाधिकारी व परिसरातील युवक-युती महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिव मल्हार प्रतिष्ठान च्या वतीने नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व सहभागी महिलांचे आभार व्यक्त केले. शिवमल्हार प्रतिष्ठानच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## विकसित भारत २०४७ संकल्पना साकार करण्यासाठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता-प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख

जालना/प्रतिनिधी विकसित भारत २०४७ ही भारत सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी संकल्पना असून ती साकार करण्यासाठी सर्व स्तरावर अगदी एका व्यक्तीपासून ते कुटुंब, खेडी शहरे , तालुका, जिल्हा, राज्य ,राष्ट्र इत्यादी स्तरावर नियोजन करून त्यानुसार देशाच्या विकासाकडे वाटचाल करण्यासाठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष डॉ.आबासाहेब देशमुख यांनी केले. महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण मंत्री व माजी आरोग्य मंत्री आणि मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना चे अध्यक्ष श्री राजेश टोपे त्यांच्या मार्गदर्शनाखाली कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबड व व्ही.आर. दाडगे लायब्ररी फाउंडेशन, लातूर यांचे संयुक्त विद्यमाने विकसित भारत २०४७या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय अधिवेशन अंबड येथे नुकतेच संपन्न झाले. १५ ऑगस्ट २०४७ रोजी साजरा करण्यात येणाऱ्या भारत स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भारत देशाला एक विकसित राष्ट्र बनविण्यासाठी विकसित भारत २०४७ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना भारत सरकारने मांडली आहे. या योजनेअंतर्गत देशाची आर्थिक उन्नती, आधुनिक तंत्रज्ञान विकस , युवा,गरीब, महिला व शेतकरी या चार घटकांच्या



सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात येणार आहे . सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण, आरोग्य सुविधा , प्रगत तंत्रज्ञान, भौतिक सुधारणा , सामाजिक विकास, समृद्ध अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा, जलसंधारण, पर्यावरण विकास, दारिद्र्य निर्मूलन , कृषी व औद्योगिक क्षेत्र विकास, सक्षम व पारदर्शक प्रशासन , ग्रीन एनर्जी विकास इत्यादींच्या माध्यमातून खेडी, शहरे, राज्य व देश समृद्ध बनवणे हा या योजनेचा हेतू आहे केंद्र सरकारची ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी सर्व स्तरावर नियोजन करून त्यानुसार प्रगतीकडे वाटचाल करणे यासाठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता आहे असे ते पुढे म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित होते. यावेळी कर्नाटका विद्यापीठाचे डॉ. गुरुराज हडळगी, एसएनडीटी विद्यापीठाचे डॉ. सुभाष चव्हाण,डॉ.बी. आर. गायकवाड, डॉ.नितीन दगडे, डॉ.जे.एन.कुलकर्णी, डॉ. जी.डी.सागर,डॉ.व्ही एम पवार इत्यादींनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. शिवशंकर घुमरे व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर राष्ट्रीय अधिवेशनास देशभरातून विविध विद्यापीठे व महाविद्यालयाचे सुमारे ८० पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## सुजात आंबेडकर यांनी घेतली स्व.यश ढाका यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

बीड/प्रतिनिधी वंचित बहुजन आघाडीचे युवानेते सुजात आंबेडकर यांनी बीड येथील स्व.यश ढाका यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे वडील पत्रकार देवेंद्र ढाका व कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन ढाका कुटुंबीयांचे सांत्वन करत त्यांना आधार देण्याचे काम केले. वंचित बहुजन आघाडी ही ढाका कौटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहेत.स्व.यश ढाका खून प्रकरणी तपाबाबतची माहिती अधीक्षक नवनित कॉवत यांना मोबाईल दूरध्वनी वरून संपर्क साधून युवा नेते सुजात आंबेडकर यांनी विचारली जर पोलीस प्रशासनाने सदर प्रकरणी तात्काळ दखल घेऊन आरोपीला अटक न केल्यास व पोलीस प्रशासनाने जर आरोपीला पाठीशी घालण्याचे काम केले मोठे जन आंदोलन उभा करू आसा आता इशारा वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी दिला.



या वेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण जाधव, जिल्हाध्यक्ष अजय सरवदे,जिल्हाउपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर,भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे कॅप्टन राजभाऊ आठवले, अमरसिंह ढाका, सचिन मेघडंबर, समाजसेविका आम्रपाली साबळे,अँड.अविनाश गंडले, रामसिंग टाक,आदी मान्यवर उपस्थित होते.सांत्वन भेटीदरम्यान वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून ढाका कुटुंबियांच्या दु:खात सहभागी झाले.

## बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करून पूरग्रस्त व शेतकऱ्यांना तात्काळ भरघोस मदत आणि संपूर्ण कर्जमाफी करावी

आंबेजोगाई/प्रतिनिधी बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अतिवृष्टीने त्रस्त झाला आहे.या आलेल्या महाभयंकर पुरामुळे सर्व ग्रामीण भाग व शेती आणि शेतकरी अडचणीत सापडून हवालदिल झाला आहे.त्यामुळे संभाजी ब्रिगेड बीड पूर्व च्या वतीने सत्ताधारी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या घरासमोर जागरण गोंधळ आंदोलन करून नंतर उपजिल्हाधिकारी यांना देखील निवेदन देऊन घोषणाबाजी करण्यात आली तसेच सध्या जिल्ह्याच्या सर्वदूर भागात शेतकऱ्यांची पिके तर पूर्णपणे उध्वस्त झालेली आहेतच परंतु पुराच्या पाण्यामुळे शेत जमीन सुद्धा खरडून गेली आहे. तसेच अनेक गावेच्या गावे पुराखाली गेलेली असल्यामुळे कुटुंबच्या कुटुंब उध्वस्त झालेली आहेत.तसेच,जनावरे आणि गुरेढोरे मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडले आहेत.शेती सोबतच घरदार,संसाराला लागणारे सर्व साहित्य आणि मुलांच्या शैक्षणिक साहित्याचे या पुराच्या पाण्यात अतोनात नुकसान झाले आहे.हातामध्ये आलेले पीक पूर्णपणे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांची जगण्याची उमेद कमजोर झाली आहे. चारही बाजूंनी तो भयानक संकटात सापडलेला असून येणाऱ्या काळात निराशा आणि नुकसानीमुळे आत्महत्या वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अशावेळी शेतकरी आणि पूरग्रस्त लोकांना आधार देणे, त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करणे,त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन त्यांना



धीर देणे हे महाराष्ट्राचे जागृत आणि संवेदनशील नागरिक म्हणून आपले सर्वांचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीला ज्या ज्या प्रकारचे सहकार्य या आपत्तीग्रस्तांना करता येईल ते प्रत्येकाने करावे.सर्व स्तरातील लोकांनी या अस्मानी संकटातून सावरण्यासाठी सर्वोतोपरी सहाय्य करावे. आमदार,नोकरदार,व्यापारी, उद्योगपती,समाजातील श्रीमंत वर्ग,सर्व शैक्षणिक संस्था,सर्व हिंदी-मराठी व इतर चित्रपट श्रृष्टी,टिव्ही चॅनल्स आणि सर्व धार्मिक स्थळे या सर्वांनी जेवढी जास्त मदत आर्थिक, वस्तूंच्या,संसार उपयोगी साहित्याच्या स्वरूपात करता येईल ती केली पाहिजे. सरकारने त्यांच्या मानसिकतेचा गांभीर्याने विचार करून त्यांना या नैराश्येतून बाहेर काढण्यासाठी आपली तिजोरी खुली करावी.कोणतेही निकष न लावता व नियमांच्या चाकोरीत न अडकता जनतेला भरघोस मदत करावी.तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून हेक्टरी एक लाख रूपये व गुराढोरांच्या बाजार किंमती प्रमाणे मदत करत त्यांना धीर द्यावा. सरकारने बाकीच्या लोकप्रिय योजनांवर काही काळ अंकुश लावून सध्याची प्राथमिकता ही फक्त आणि फक्त अतिवृष्टी आणि पुरामुळे संकटात सापडलेल्या लोकांना जास्तीत जास्त सहकार्य करणे आहे हे लक्षात घेऊन त्यांना मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे आणि संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जाण्याची महाराष्ट्राची महान परंपरा कायम ठेवावी ही विनंती यावेळी उपस्थित रामकिसन मस्के सर,विभागीय सदस्य प्रवीण ठोंबरे सर,जिल्हाध्यक्ष शिवश्री राहुल खोडसे, अंबाजोगाई महिला आघाडी अध्यक्ष अश्विनी ताई यादव,सतीश कुंडगर,नारायण मुळे,चौधरी उमेश, खोडसे विशाल,कमलाकर चव्हाण,ओमकार पतंगे जोतिराम माने,पुष्कर रुपदास,अतुल गुजर,केराव टेहेरे,गजानन प्रताप अंबाड, हर्षवर्धन तरकसे, शिवाजी गुजर,मनोज गुजर इत्यादी होते.

## साथीच्या रोगांपासून जनावरांच्या संरक्षणासाठी लातूर ग्रामीण मध्ये लसीकरण मोहीम हाती घेण्यात यावी. प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते धिरज विलासराव देशमुख यांची पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या कडे मागणी

लातूर :-- अतिवृष्टी,पूर यामुळे मानवी जीवनासह पशुधन पिकांचे व मालमत्तेचे नुकसान तसेच पायाभूत सुविधांची हानी झाली आहे तर दुसरीकडे हवामानातील बदल व नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनातील त्रुटी हे अतिवृष्टीशी संबंधित प्रश्न निर्माण झाले आहेत. यामुळे जनावरांमध्ये साथीचे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. साथीच्या रोगापासून जनावरांना संरक्षण मिळण्यासाठी लातूर, रेणापूर व औसा या तालुक्याच्या ठिकाणी लसीकरण शिबीराचे आयोजन करावे अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते, जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या कडे पत्राद्वारे केली आहे. या शिबीरांमध्ये जनावरांना आवश्यक औषधे आणि लसींचा पुरेसा साठा उपलब्ध करावा आणि भविष्यात अशा घटना अधिक वारंवार आणि विनाशकारी होण्याची शक्यता असल्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कायमस्वरूपी आणि प्रभावी उपाययोजना अंमलात आणून या संदर्भात पशुपालकांमध्ये जनजागृती करावी अशी देखील मागणी करण्यात आली आहे. तरी लातूर, रेणापूर व औसा या तालुक्याच्या ठिकाणी लसीकरण शिबीर आयोजन करण्या संदर्भात संबंधितास आदेशित करावे,असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# अतिवृष्टीबाधितांच्या मदतीसाठी जे.एस.पी.एम., लातूर शिक्षण संस्थेच्या वतीने ५ लाखांचा निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धनादेश सुपूर्द

लातूर / प्रतिनिधी :– लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांचे पुर परिस्थितीने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महायुती सरकारच्या वतीने नुकसानग्रस्तांना मदत प्राप्त होणारच आहे. सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या जे.एस.पी.एम., लातूर शिक्षण संस्थेच्या वतीने याही वेळी पुन्हा एकदा आपली सामाजिक जबाबदारी निभावलेली आहे. माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या पुढाकारातून अतिवृष्टीबाधितांच्या मदतीसाठी ५ लाखांचा निधी जाहीर करण्यात आलेला असून या रकमेचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेला आहे.

गत महिनाभरापासून लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन काही ठिकाणी ढगफुटी सदृश पाऊस पडलेला आहे. परिणामी बहुतांश ठिकाणी पुर परिस्थिती उद्भवलेली आहे. यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून त्यांच्यावर आभाळ फाटल्यासारखे संकट ओढावलेले आहे. या संकटात त्यांना मदतीचा हात मिळणे आवश्यक आहे. महायुती सरकारच्या वतीने नुकसानग्रस्तांना मदत प्राप्त होणार आहे. मात्र नेहमीच सामाजिक बांधिलकी जोपासणारे कव्हेकर कुटुंब याही वेळी अतिवृष्टीबाधितांच्या मदतीसाठी धावून आलेले आहे. अतिवृष्टीबाधितांच्या मदतीसाठी जे.एस.पी.एम. लातूर शिक्षण संस्थेच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ५ लाख रुपयांचा निधी जाहीर करण्यात आलेला आहे.

माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी यासाठी पुढाकार घेतलेला असून सदर रकमेचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या दोघांनी सुपूर्द केला आहे. यावेळी माजी आ. कव्हेकर यांनी अतिवृष्टी झाल्यामुळे जी परिस्थिती उद्भवलेली आहे त्याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितली. तसेच या परिस्थितीत सरकारच्या वतीने ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा अशी मागणी करून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना अधिकाधिक मदत प्राप्त व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. या माध्यमातून राज्यातील जनतेच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे राहील, असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लातूर येथील जिल्हा रुग्णालयासह कव्हा येथील विभागीय क्रिडा संकुलाचे भुमीपुजन सोहळ्यासाठी आपण यावे अशी विनंती करून त्याकरिता निमंत्रित केले आहे. लातूर शहरासह जिल्ह्यात आयुर्वेदास प्राध्यान्य देण्यात येत असून याकरिता लातूर येथे जिल्हास्तरीय आयुष रुग्णालय सुरु करण्यास मान्यता देऊन त्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी केली.

## ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन निमित्त मनपा आयुक्त यांना निवेदन.

लातूर – विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या वतीने लातूर शहरातील तमाम आंबेडकरी जनतेतर्फे मनपा आयुक्तांकडे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्टॅच्यू ऑफ नॉलेज ७५ फुटी पुतळा तसेच डॉ. बाबासाहेब



आंबेडकर पार्क व चौक सुशोभीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत सार्वजनिक समितीचे अध्यक्ष मा. सुशील कुमार चिकटे यांनी स्पष्ट केले की, स्टॅच्यू ऑफ नॉलेजसाठी पूर्वीच १० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला असला तरी हा निधी अपुरा असल्याने काम रखडले आहे. त्यामुळे अशोका विजयादशमीच्या शुभदिनी या कामाचा शुभारंभ व्हावा, अशी जनतेची अपेक्षा आहे. यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कचे सुशोभीकरण तातडीने सुरू करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील सुशोभीकरणाच्या कामात संविधान समर्पित शिल्प उभारणे, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, उत्कृष्ट लाईटिंगची सोय करणे यासाठीही वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची विनंती समितीने केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील असलेली कोनशिला जशीच्या तशी बसवावी तसेच संपूर्ण सुशोभीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी जनतेने अपेक्षा व्यक्त केली आली. या प्रसंगी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे,साधूभाऊ गायकवाड,विनय जाकते,डी.उमाकांत,बाबासाहेब गायकवाड,रविभाऊ गायकवाड, आकाश सरवदे,सिद्धांत चिकटे, पप्पूभाऊ सरवदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते..

## केज शहरातील श्रीमंत नानासाहेब देशपांडे प्रतिष्ठान तर्फे पूरग्रस्तांना २५ हजारांची मदत

केज/प्रतिनिधी मराठवाड्यासह महाराष्ट्रात पावसाने घातलेल्या थैमानाने अनेक गावातील लोकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे अशा या संकटाच्या काळात सर्वांच्या आशा , अपेक्षा सरकार कडूनच आहेत महाराज देशपांडे केजकर प्रतिष्ठानच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २५ हजार रुपये आपले उत्तर दायित्व म्हणून केजचे तहसीलदार श्री राकेश गिड्डे यांच्याकडे २५ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्त केला .या प्रसंगी श्री सुनील बापू




.आता शासनाच्या मदतीशिवाय या अस्मानी संकटाचा सामना करणे अशक्य आहे.अशा या संकटाच्या वेळी महाराष्ट्र शासनाबरोबर सहभागी होऊन पुरग्रस्त बांधवांना शक्यतो मदत करणे आवश्यक आहे . परमपूज्य श्रीमंत नानासाहेब देशपांडे, प्रशांत देशपांडे,समीर देशपांडे, अवधूत देशपांडे, प्रविण देशपांडे, मंदार देशपांडे, राजीव देशपांडे, सुनिल देशपांडे या पुरग्रस्त जनतेसाठी हे कार्य अतुलनीय आहे

## राज्य परिचारीका संघटना शाखा लातूर –संचलित उत्सव समितीच्या वतीने सोलापूर पुरग्रस्तासाठी मदतीचा हात






लातूर :– महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना शाखा लातूर –संचलित उत्सव समितीच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील पुरग्रस्तासाठी मदतीचा हात दरवर्षी नवरात्रात परिचारिकांसाठी रुग्णालय परिसरात दांडिया कार्यक्रम आयोजित केला जातो. परंतु यावर्षी नैसर्गिक आपत्तीच्या तडाख्यात अनेक कुटुंबे गाव सापडली असल्याने त्यांचे कुटुंब उद्धस्त झाले आहे. हे लक्षात घेता उत्सव समिती व महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूर च्या पदाधिकारी सदस्यांनी दांडिया कार्यक्रम आयोजित न करता पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्याचा निर्णय बहुमताने घेतला व आज सोलापूर जिल्ह्यातील सिना नदी काठावरील नागरिकांची घरं पाण्याखाली असल्याने, अन्नधान्य किट (तांदूळ, साखर, मुगडाळ, चहा पावडर, तिखट मीठ ई. ), नवीन साड्या, पुरुष महीला मुला–मुलींचे कपडे, अंथरून पांघरून, सतरंज्या बॅटरी इत्यादी जमेल ते साहीत्य संकलित करुन सोलापूर जिल्ह्यातील पुरग्रस्तांसाठी पाठवण्यात आले. आज ३० सप्टेंबर आजच्याच दिवशी १९९३ साली लातूर जिल्ह्यातील अनेक गावं भिषण भुकंपामुळे बेचिराख झाली होती. किल्लारी गाव भुईसपाट झाले होते. त्या परिस्थितीची जाण व या भुकंपात ज्यांची कुंटुंब उध्वस्त झाली अशा सदस्यांनीही त्यांच्या नातलगांच्या स्मरणार्थ आज पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य उपलब्ध करून दिले. याशिवाय या मदतकार्यात महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना शाखा लातूर संचलित उत्सव समितीच्या अध्यक्ष श्रीमती किरण निकम, संघटनेच्या अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण, सहसचिव भगवान केंद्रे, सहखजिनदार दिपक शिंदे,संघटना व उत्सव समिती सदस्य श्रीमती वनमाला पांचाळ, सुधा तोरणेकर, सुमित्रा तोटे, मीना गावकरे, निर्मला गाडेकर, शोभा जाधव, श्रीमती कोंडाबाई बनसोडे, प्रेमा उबाळे, पुष्पा जावळे, ज्योती भारती, अंजली जोशी, उर्मिला जाभाडे, राणी जाधव, श्री योगेश वाघ, रघुवीर फुलसे, कृष्णा नागरगोजे, शुभम वानखेडे, कृष्णा नागरगोजे, अमित मलिशे, श्री सुरज अजय मस्के, इत्यादींनी सहकार्य केले.

## लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई आणि शेतमजुरांना तात्काळ आर्थिक अनुदान द्या – अक्षय धावारे

### जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना भिम आर्मी चे निवेदन



लातूर :– लातूर जिल्ह्यामध्ये परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला घास हेराहून गेला आहे. जिल्ह्यातील लाखो हेक्टर पिक पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच शेतकऱ्यावर अवलंबून असलेल्या शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे, यासाठी शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी तसेच शेतमजुरांनाही आर्थिक अनुदान देऊन त्यांची आर्थिक अडचण सोडवावी. यासाठी जिल्हा पातळीवर नियोजन करून तात्काळ पंचनामे करावेत आणि शक्य होईल तितक्या लवकर शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांना आथिक मदत देण्यात यावी वरील सर्व बाबी लक्षात घेऊन लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना व शेतमजुरांना नुकसान भरपाई देण्यात यावी. अन्यथा भिम आर्मी भारत एकता मिशन मुख्यमंत्र्यांच्या दालना समोर शेतकरी आणि शेतमजूर यांना घेऊन तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा भिम आर्मी च्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना दिला या वेळी भिम आर्मी चे मराठवाडा निरीक्षक अक्षय धावारे जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे जिल्हा उपाध्यक्ष विशाल पोटभरे जिल्हा सचिव बबलू शिंदे जिल्हा कार्याध्यक्ष बबलू गवळे जिल्हा संघटक सोनू घोडके लातूर तालूका अध्यक्ष बप्पा घनगावकर शहर अध्यक्ष संदिप कांबळे कार्तिक गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## अतिवृष्टीग्रस्त व पुरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करावे ठाकरे सेना जिल्हाप्रमुख ...संतोष सोमवंशी

लातूर :–अतिवृष्टीग्रस्त व पुरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे लातूर जिल्हयासह मराठवाडा तसेच राज्यातील काही जिल्हयात गेले काही दिवस सतत ढगफुटीसदृश्य मुसळधार पाऊस कोसळत असल्याने अतिवृष्टी होऊन नद्या, नाले, ओढयांना महापुर येऊन सर्वच शेतीपिकांचे, फळबागांचे व पशुधनांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास नैसर्गिक आपत्तीमुळे हिरावला आहे. तसेच महापुराने नदी, नाले व ओढया काठच्या जमिनी खरडुन जाऊन अतोनात नुकसान होऊन गावची गावे पाण्यात गेल्याने




अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. शेतकरी व सामान्य जनता प्रचंड अडचणीत आले आहेत. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) च्या परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर असुन उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) च्या परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर आहे. तसेच तरी शासनाने लातूर जिल्हयासह मराठवाडा तसेच राज्यातील पुरग्रस्त भागातील फेब्रवारी–मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता १० वी माध्यमिक शालांत परिक्षांचे आणि इयत्ता १२ वी उच्च माध्यमिक शालांत परिक्षांचे शुल्क माफ करून नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या पालकांना व विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे

## गुहागर तालुक्याची सुकन्या आर्या मनोज जाधव भीमकन्या गौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानित

मुंबई :– बौद्धजन सहकारी संघ (रजि.) मुंबई, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा वर्षावास प्रवचन मालिका सालाबादप्रमाणे याही वर्षी मुंबईमध्ये त्रेसश्रश चशशीं रििद्वारे ऑनलाईन पद्धतीने व गाव शाखेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, शृंगारतळी येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली होती, सदर वर्षावास प्रवचन मालिका २०२५ चा सांगता समारंभ मुंबई शाखा अध्यक्ष सुरेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली बालमित्र क्रीडा मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर





सभागृह, जुनी बी. डी. डी. चाळ ३ अ व ४ अ च्या मध्ये, नायगाव, दादर (पूर्व), मुंबई – १४ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी ज्योत प्रज्वलित करून संस्कार समितीचे अध्यक्ष संदीप गमरे व ग्रुप यांनी सुश्राव्य व सुमधूर वाणीने बुद्धवंदना पठण करून कार्यक्रमास प्रारंभ केला, सरचिटणीस संदेश गमरे व संस्कार समितीचे चिटणीस सचिन मोहिते यांनी यांनी आपल्या पहाडी आवाजात लाघवी व ओघवत्या भाषाशैलीत बहारदार असे सूत्रसंचालन केले तर संस्कार समितीचे अध्यक्ष संदीप गमरे यांच्या हस्ते पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले, तालुका चेअरमन दीपक मोहिते यांनी प्रास्ताविक सादर करत असताना गेल्या आठ वर्षाच्या कालावधीत बौद्धजन सहकारी संघाच्या मार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा लेखाजोखा सादर केला व हे सर्व आपल्या पाठिंब्यामुळे व अमूल्य साथीमुळे तालुक्याची आर्थिक घडी बसवत संघटना संघटित ठेवता आली यावर्षी तालुक्यातील कु. आर्या मनोज जाधव (गुहागर) हिने राष्ट्रीय स्तरावरील हिंदी वक्तृत्व स्पर्धेत ५००० विद्यार्थ्यांमधून देशात चौथा तर महाराष्ट्र राज्यात पहिला क्रमांक पटकावला, कु. निधी राजेश पवार (वरवेली) हिने कंपनी सेक्रेटरी (उड) परीक्षेत देशभरातून लाखो उमेदवारांमधून २४ वा क्रमांक पटकावला, कु. पूनम संतोष मोहिते (कौंढर–काळसूर) हिची राज्यस्तरीय रग्बी स्पर्धेत जिल्हा संघाचे नेतृत्व करण्यासाठी निवड करण्यात आली, कु. डॉ. मधुरीमा जाधव हिची महाराष्ट्र शासन मत्स्य विभागात सहाय्यक आयुक्त पदी नियुक्ती झाली, कु. सुषमा विजय जाधव हिची न्यायाधीश पदी नियुक्ती झाली अशी भव्यदिव्य नेत्रदीपक तालुक्यातील विद्यार्थ्यांनीनी केल्याबद्दल प्रथमच भीमकन्या गौरव पुरस्कार – २०२५ आपण याठिकाणी जाहीर करत आहोत, मुंबईस्थित विद्यार्थ्यांचा गुणगौरव डिसेंबर २०२५ मध्ये करण्यात येणार असून, ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आज आयोजित करण्यात आला आहे असे नमूद केले. तसेच सदर वर्षावास प्रवचन मालिकेत ज्या ज्या वक्त्यांनी विविध प्रकारचे वेगवेगळे विषय हाताळून समाजाला योग्य दिशा देण्यासाठी व धम्मप्रचार, धम्मप्रसार करण्यासाठी वेळात वेळ काढून हजर राहिल्याबद्दल सर्व वक्त्यांना व मान्यवरांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सदर प्रसंगी गुहागर तालुक्याची सुकन्या आर्या मनोज जाधव हिला भीमकन्या गौरव पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात आले त्यावेळी सत्काराबद्दल आभार व्यक्त करताना कु. आर्या जाधव हिने हिंदी व इंग्रजी भाषेतून, कु. निधी राजेश पवार हिने इंग्रजी भाषेतून आपले विचार मांडून सदर स्पर्धा या मेहनत घेतली तर अत्यंत सोप्या आहेत त्याकरता कश्या पद्धतीने अभ्यास करायला हवा यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले. सदर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते संजय पवार यांनी बौद्ध धम्म आणि धम्माची ओळख या विषयावर बोलत असताना बुद्ध म्हणजे ज्ञान, पंचशील, अष्टशील, दशशील आणि आर्यअष्टांग मार्ग यावर मनन, चिंतन करून त्यांना आपल्या जीवनात उतरवल तर आपण बुद्धाच्या आदर्शमार्गावर चालू शकतो हीच खरी आदर्श जीवनपद्धत आहे असे मौलिक विचार अनेक सौंदहरणासह मांडून सर्वांना गोडवाणीने मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी प्रमुख विश्वस्त सिद्धार्थ पवार, दीपक जाधव, पांडुरंग गमरे, माजी विश्वस्त संजय पवार, के. सी. जाधव, सुशील जाधव, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, उपकार्याध्यक्ष अशोक कदम, माजी उपकार्याध्यक्ष प्रभाकर पवार, गाव शाखेचे माजी चिटणीस विश्वास मोहिते, मुंबई कोषाध्यक्ष प्रदीप कदम, शिक्षण समितीचे अध्यक्ष संजीवनी यादव, न्यायदान कमिटीचे अध्यक्ष शशिकांत मोहिते, विभाग अधिकारी संतोष पवार, किशोर जाधव, शैलेश जाधव, राजेश पवार, मनोहर जाधव गुरुजी, गुहागर शाखेचे अध्यक्ष राहुल कदम त्यांचे सहकारी, सदस्य रुपेश सावंत, प्रत्येक शाखेचे अध्यक्ष, सात विभागाचे विभाग अधिकारी, मध्यवर्ती कमिटी, आजी माजी विश्वस्त, आजी माजी कार्यकर्ते, महिला मंडळ आदी तुफान पावसाची पर्वा न करता मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार मानून सरचिटणीस संदेश गमरे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE